# ग्राहक गा-हाणे निवारण मंच

## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

## औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

**Old Power House Premises, Dr.Ambedkar Road, Aurangabad. Phone: 0240 - 2336172**


**No,CGRF/AZ/U / 180 / 2009 / 14 /** **Date :-**

**To,**
**The Executive Engineer ( Administration)**
**O/O Superintending Engineer ,**
**O&M Urban Circle , M.S.E.D.C.L.,**
**Aurangabad.**

**Sub:- Forwarding of grievance in respect of Shri Prakash Narayan Shevte, RM 61, Near High Tech College, Waluj, MIDC Area Bajaj Nagar, Aurangabad. Consumer No. 490011807221**

**Dear Sir,**

**Please find enclosed herewith a copy of the grievance application received by the Forum from Shri Prakash Naraya n Shevte, RM 61, Near High Tech College, Waluj, MIDC Area Bajaj Nagar, Aurangabad.**

**You are requested to submit your para wise reply on the grievance within 15 days from the date of receipt of this letter along with related documents.**

**The hearing in this matter is kept on 17/02/2009 at 12=00 Hrs.**

**Encl: As above**

**Member/Secretary**
**CGRF(AZ) MSEDCL**
**Aurangabad.**

**Copy to:-**
**Shri Prakash Narayan**
**Shevte, RM 61, Near High Tech College,**
**Waluj, MIDC Area Bajaj Nagar,**
**Aurangabad.**

# ग्राहक गा-हाणे निवारण मंच

## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

**तक्रार क्र.सीजीआरएफ/एझेड/यु/१८०/२००९/१४**

**तक्रार दाखल दिनांक ;- ०५/०२/२००९**
**निकाल दिनांक ;- १७/०३/२००९**

**श्री प्रकाश नारायण शेवते,**
**आर.एम.६१,हायटेक कॉलेज जवळ,**
**वाळुज एम.आय.डी.सी., बजाजनगर,**
**औरंगाबाद.**
**(ग्राहक क्र.४९००११८०७२२१) अर्जदार/ग्राहक**

**विरुध्द**

**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित**
**शहर विभाग औरंगाबाद.**

**गैरअर्जदार**

| | | |
|---|---|---|
| **कोरम** | **विष्णु अं. हंबिरे** | **अध्यक्ष** |
| | **हेमंत अ. कापडीया** | **सदस्य** |
| | **प्र. अ. सगणे** | **सदस्य/सचिव** |

## आदेश

अर्जदाराने ग्राहक गा-हाणे निवारण मंचासमोर 'अनुसुची - अ' मध्ये, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व लोकपाल ) विनियम २००६ च्या नियम ६.१० अंतर्गत

तक्रार दाखल केली आहे. अर्जदाराने दाखल केलेल्या तक्रारीची एक प्रत दिनांक ०५/०२/२००९ रोजी औरंगाबाद शहर मंडळाचे कार्यकारी अभियंता ( प्रशासन ) व नोडल अधिकारी, औरंगाबाद यांना पाठविण्यात आली. अर्जदाराच्या गा-हाण्याबाबतची सुनावणी दिनांक २५/०२/२००९ रोजी ठेवण्यात आली.

ग्राहकाने दाखल केलेल्या तक्रारीचा सारांश खालीलप्रमाणे आहे.

१) अर्जदाराने महावितरण कंपनीकडुन वाणिज्य वापरासाठी वीज पुरवठा घेतला असुन त्याच्या ताब्यात असलेली दुकान त्यांनी राजु जवंजाळ यांना फोटो स्टुडीओ चालवण्यासाठी दिले आहे. त्यांनी महावितरण तर्फे मार्च २००८ मध्ये त्यांना देण्यात आलेले ८४०/- रूपयाचे वीज बिल भरले. एप्रिल २००८ मध्ये त्यांना वीज बिल देण्यात आले नाही. पण त्यानंतर मे २००८ मध्ये त्यांना ४०२ युनिटचे वीज बिल देण्यात आले अर्जदाराने त्याचा वीज वापर हा कमी असुन सुधारीत वीज बिल देण्याची विनंती महावितरणच्या संबंधीत कार्यालयाकडे केली. पण त्यांच्या तक्रारी ची दखल घेण्यात न आल्यामुळे त्यांनी मंचात ही तक्रार दाखल केली असुन त्यांना सुधारीत वीज बिल देण्याबाबत आदेश देण्याची विनंती मंचास केली आहे.

२) दिनांक ०५/०२/२००९ रोजी झालेल्या सुनावणीस अर्जदार प्रतिनिधी श्री राजु जवंजाळ उपस्थित होते. महावितरण तर्फे नोडल अधिकारी श्री जी.एस.राठौर व वाळुज उपविभागाचे कार्यकारी अभियंता श्री सरक उपस्थित होते. नोडल अधिकारी यांनी अर्जदाराच्या तक्रारीवर आपला जवाब मंचात दाखल केला. अर्जदाराचे जानेवारी २००८ मध्ये मीटर बदलण्यात आले. त्यावेळी जुन्या मीटरवरील रिडिंग प्रमाणे अर्जदारास बिल आकारण्यात आले व ते योग्य असल्याचे त्यांनी म्हटले आहे. आपल्या जवाबासोबत नोडल अधिकारी यांनी अर्जदाराचे सि.पी.एल. मीटर बदली अहवाल,स्थळ पाहणी अहवाल मंचात दाखल केला अर्जदाराने जुने मीटरच्या बाबतीत तक्रार असल्याचे सांगत

त्याची चाचणी करण्यात आली नसल्याचे सांगितले. नोडल अधिकारी यांनी अर्जदाराच्या समक्ष मीटर चाचणी करण्यासाठी तयारी दर्शविली.मंचाने पुढील सुनावणी अगोदर मीटरचा चाचणी अहवाल मंचात दाखल करण्याचे आदेश दिले व सुनावणी ०७/०३/२००९ रोजी घेण्याचे निश्चीत केले.

३) दिनांक ०७/०३/२००९ रोजी झालेल्या सुनावणीस अर्जदार प्रतिनिधी व नोडल अधिकारी उपस्थित होते. नोडल अधिकारी यांनी जुन्या मीटर चा चाचणी अहवाल मंचात दाखल केला व मीटर मध्ये कोणताही दोष नसल्याचे सांगितले. अर्जदाराने मीटरची चाचणी योग्य प्रमाणे करण्यात आली नसल्याचे सांगितले महावितरण अतिरिक्त अन्य संस्थाकडे मीटर चाचणी करण्याबाबत मंचाने अर्जदाराकडे विचारणा केली असता अर्जदाराने महावितरणतर्फे करण्यात आलेली मीटर चाचणी मान्य करीत दाखल केलेली तक्रार मागें घेण्याची तयारी दर्शविली. मंचाने परवानगी दिल्यावर अर्जदाराने मंचात दाखल केलेली तक्रार रद्द करण्याबाबत पत्र दाखल केले.

अर्जदाराने मंचात दाखल केलेली तक्रार परत घेतल्यामुळे प्रकरण खारीज करण्यात येत आहे.

वरील आदेशाचे ग्राहक व महावितरण कंपनी यांनी पालन करावे व त्याबाबत मंचास कळवावे.

गा-हाणे निकाली काढण्यात आले असुन हे ग्राहकास व वितरण कंपनीस कळवावे.

| | | |
|---|---|---|
| **हेमंत अ. कापडिया** | **प्र. अ. सगणे** | **विष्णु अं. हंबिरे** |
| **सदस्य** | **सदस्य/सचिव** | **अध्यक्ष** |

# ग्राहक गा-हाणे निवारण मंच
## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

जुने पावर हाऊस परिसर.डॉ.बाबासाहेब आंबेडकर रोड, मिल कॉर्नर, औरंगाबाद. - ४३१ ००१, दुरध्वनी व फॅक्स -०२४० - २३३६१७२.

**क्र.सीजीआरएफ/एझेड/यु/१८०/२००९/१४** **दिनांक :-**

**प्रति,**
**श्री प्रकाश नारायण शेवते,**
**आर.एम.६१,हायटेक कॉलेज जवळ,**
**वाळुज एम.आय.डी.सी., बजाजनगर,**
**औरंगाबाद.**

( तक्रार क्र.सिजीआरएफ/एझेड/यु/१८०/२००९/१४ )

आपण दिनांक ०५/०२/२००९ रोजी दाखल केलेल्या तक्रारीवरील या मंचाचा आदेश सोबत जोडला आहे. हा आदेश मान्य नसल्यास आपण विद्युत लोकपाल यांच्याकडे ६० दिवसाच्या आंत अपिल दाखल करू शकता.

**सदस्य/सचिव**
**ग्राहक गा-हाणे निवारण मंच**
**म.रा.वि.वि.कं.म.औरंगाबाद.**

**प्रती, सविनय सादर,**
**मुख्य अभियंता परिमंडळ कार्यालय,**
**म.रा.वि.वि.क.मर्या.औरंगाबाद.**

**प्रती,कार्यकारी अभियंता (प्रशासन),**
**अधिक्षक अभियंता यांचे कार्यालय,**
**म.रा.वि.वि.कं.म. शहर मंडळ, औरंगाबाद**
**माहिती व उचीत कारवाही करीता**

**विद्युतलोकपालाचा पत्ता,**
**विद्युत लोकपाल,**
**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग,**
**६०६-६०८, केशवा, बांद्रा - कुर्ला कॉम्प्लेक्स, मुंबई - ४०० ०५१.**
**दुरध्वनी क्र. ०२२-२६५९०३३९.**